असुधारित प्रत

# महाराष्ट्र विधानसभा

**दिवसाच्या कामकाजाचा क्रम**
**मंगळवार, दिनांक १० मार्च, २०१५**
**(सकाळी ११.०० वाजता)**

**एक** : **नवनिर्वाचित सदस्यांचा परिचय.**

**दोन** : **प्रश्नोत्तरे -**

**तीन** : राज्यपालांच्या अभिभाषणाची प्रत सभागृहाच्या पटलावर ठेवणे.

**चार** : राज्यपालांच्या अभिभाषणाबद्दल आभार प्रदर्शनाचा प्रस्ताव.

**पाच** : **पुढील अध्यादेश सभागृहासमोर ठेवण्यात येतील :-**

**(१) मुख्यमंत्री** :
(क) सन २०१४ चा अध्यादेश क्रमांक १८ - महाराष्ट्र महानगरपालिका आणि महाराष्ट्र नगर परिषदा, नगर पंचायती व औद्योगिक नगरी (सुधारणा) अध्यादेश, २०१४ सभागृहासमोर ठेवतील.

(ख) सन २०१५ चा महाराष्ट्र अध्यादेश क्रमांक २ - महाराष्ट्र पोलीस (सुधारणा) अध्यादेश, २०१५ सभागृहासमोर ठेवतील.

**(२) महसूल मंत्री** : सन २०१५ चा अध्यादेश क्रमांक ३ - नांदेड शीख गुरुद्वारा सचखंड श्री हजुर अपचलनगर साहिब (सुधारणा) अध्यादेश, २०१५ सभागृहासमोर ठेवतील.

**(३) वित्त मंत्री** : सन २०१५ चा अध्यादेश क्रमांक १ - महाराष्ट्र आकस्मिकता निधी (सुधारणा) अध्यादेश, २०१५ सभागृहासमोर ठेवतील.

**(४) उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** : सन २०१५ चा अध्यादेश क्रमांक ४ - महाराष्ट्र विद्यापीठ (सुधारणा) अध्यादेश, २०१५ सभागृहासमोर ठेवतील.

**सहा** : सन २०१४-२०१५ च्या पुरवणी मागण्या सादर करणे.

**सात** : विधानसभेने संमत केलेल्या विधेयकांना विधानपरिषदेची संमती व दोन्ही सभागृहांनी संमत केलेल्या विधेयकांना राष्ट्रपती/ राज्यपालांची अधिसंमती मिळाल्याचे जाहीर करण्यात येईल.

**आठ** : अध्यक्ष, सभाध्यक्षांची तालिका नामनिर्देशित करतील.

**नऊ** : **स्थगन प्रस्तावाच्या सूचना - (असल्यास) (म.वि.स. नियम ९७ अन्वये).**

**दहा** : **लक्षवेधी सूचना (म.वि.स. नियम १०५ अन्वये) :-**

**( अप्राप्त)**

**( दुपारी १.३० ते २.०० वाजेपर्यंत- मध्यंतर )**

**अकरा** : **शासकीय विधेयके :-**

**पुर:स्थापनार्थ :-**

(१) सन २०१५ चे विधानसभा विधेयक क्रमांक २ - महाराष्ट्र महानगरपालिका आणि महाराष्ट्र नगरपरिषदा, नगर पंचायती व औद्योगिक नगरी (सुधारणा) विधेयक, २०१५.

(२) सन २०१५ चे विधानसभा विधेयक क्रमांक ३ - महाराष्ट्र पोलीस (सुधारणा) विधेयक, २०१५.

(३) सन २०१५ चे विधानसभा विधेयक क्रमांक ४ - महाराष्ट्र ग्रामपंचायत (सुधारणा) विधेयक, २०१५.

**बारा** : **सत्तारुढ पक्षाचा प्रस्ताव.**

**( अप्राप्त)**

**तेरा : अर्धा-तास चर्चा (म.वि.स. नियम ९४ अन्वये) :-**

(१) **श्री.छगन भुजबळ, वि.स.स.** पुढील सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीवर चर्चा उपस्थित करतील.

**"ओबीसी, एससी, व्हीजेएनटी आणि एसबीसी प्रवर्गातील विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती मिळत नसल्याबाबत"** या विषयावरील डॉ.बालाजी किणीकर, वि.स.स. यांचा तारांकित प्रश्न क्रमांक ४२०५ ला दिनांक २२ डिसेंबर, २०१४ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात अर्धा-तास चर्चा उपस्थित करतील.

(२) **श्री.छगन भुजबळ, वि.स.स.** पुढील सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीवर चर्चा उपस्थित करतील.

**"राज्यातील ग्रामीण भागातील आश्रमशाळेतील विद्यार्थ्यांच्या आरोग्याकडे दुर्लक्ष होत असल्याबाबत"** या विषयावरील डॉ.सुधाकर भालेराव, वि.स.स. यांचा तारांकित प्रश्न क्रमांक १६४७ ला दिनांक २२ डिसेंबर, २०१४ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात अर्धा-तास चर्चा उपस्थित करतील.

**विधान भवन,**
मुंबई,
दिनांक : ९ मार्च, २०१५

**डॉ. अनंत कळसे,**
प्रधान सचिव,
महाराष्ट्र विधानसभा.